वेतन झाल्यापासून ५ दिवसाच्या आत संबंधीत कर्मचाऱ्याला वेतनपावती देणेबाबत....

**डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला**
**अर्थ प्रशासन विभाग**
**पी.ओ. कृषि नगर, अकोला -४४४ १०४ (महाराष्ट्र)**

---

**जा.क्र.अप्रवि/ अंदाज/** 2220 **/२०१९** **दिनांक:२२/१०/२०१९**

**संदर्भ:** मा.कुलगुरु महोदय यांचे मौखिक आदेश....

# परिपत्रक

विद्यापीठातील आहरण व संवितरण अधिकारी यांचे कडून त्यांच्या आस्थापने वरील सर्व कार्यरत असलेल्या अधिकारी / कर्मचारी यांना त्यांच्या वेतनाबाबत वेतनपावती देण्यात येते, त्यामुळे संबंधीत अधिकारी / कर्मचारी यांच्या वेतनाबाबत काही तफावत असल्यास ते संबधित आहरण व संवितरण अधिकारी यांच्या निर्देशनास आणून देऊन त्याबाबतच्या त्रुटींची पूर्तता करतात.

परंतु, अद्यापही काही आहरण व संवितरण अधिकारी यांच्याकडून त्यांच्या आस्थापणेवरील अधिकारी / कर्मचारी यांना त्यांच्या वेतनबाबतची वेतनपावती देण्यात येत नाहीत असे निर्दशनास आले आहे व सदर बाबतीत मा.कुलगुरु महोदय यांनी दक्षता घेण्याविषयी आदेशीत केले आहे. करीता विद्यापीठातील सर्व आहरण व संवितरण अधिकारी यांना सुचित करण्यात येते की, वेतनदेयक पारीत झाल्याच्या दिनांकापासून पाच दिवसाच्या आत त्यांच्या आस्थापनेवरील सर्व अधिकारी / कर्मचारी यांना वेतनपावती वितरीत करण्यात याची जेणेकरुन सबंधीताच्या वेतनात काही तफावत /त्रुटी असल्यास ते त्वरीत संबंधित आहरण व संवितरण अधिकारी यांच्या निर्देशनास आणून देऊ शकतील व त्याबाबत त्वरीत पुर्तता करता येईल.

नियंत्रक
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ
अकोला

**प्रत :** १) सर्व विभागप्रमुख/आहरण व संवितरण अधिकारी, डॉ.पं दे.कृ.वि., अकोला / नागपूर.
२) मा.कुलगुरु महोदय यांचे स्वीय सहायक, डॉ.पं.दे.कृ.वि.,अकोला यांना मा.कुलगुरु महोदय यांचे माहितीस्तव.
३) कुलसचिव, डॉ. पं. दे. कृ. वि., अकोला यांना माहितीस्तव.
४) प्रभारी अधिकारी, संगणक प्रणाली कक्ष, डॉ.पं.दे.कृ.वि.,अकोला यांना विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसारणाकरीता.

नियंत्रक
22/10/19

E:kakade sir nitin doc/ circular